नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०६/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड :— दिनांक ०३/११/२०१७ चे १२.४९ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ६६९/२०१७ कलम ३५४(क), ५०४, ५०६ भादवी सहकलम ११(४), १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/११/२०१७ चे ०८.०० वा. ते ०८.३० वा. सुमारास अल्पवयीन फिर्यादी/पीडित मुलगी वय १६ वर्ष हि बाथरूम मध्ये आंघोळ करीत असतांना आरोपी नामे— महेश मोरेश्वर डंभारे, वय २५ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड नागपूर याने स्वत:चा मोबाईल बाथरूमच्या दाराच्या वरच्या फटीमध्ये ठेवून फिर्यादीचा व्हिडीओ शुट केला. फिर्यादीने मोबाईल घेतला असता आरोपीने मोबाईल हिसकवून शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. आरोपीला दि. ०३/११/२०१७ चे २०.०७ वा. सुमारास अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि आरती उघडे पो.स्टे. उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०६/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री के जी राठी, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ (सी) भादंवि. मध्ये २ वर्ष कारावास सश्रम कारावास व २००० रू दंड व दंड न भरल्यास ४ महिने सश्रम कारावास उपरोक्त शिक्षा हि कलम ११, १२ पोक्सो मध्ये सारखी आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री श्याम खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोहवा रामदास कोराम व पोना प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर